# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मुंबईच्या ईगल सिक्युरिटी कंपनीच्या भरतीबाबत**

**(१) ८३२१ (०६-०४-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मुंबईच्या ईगल सिक्युरिटी कंपनीमार्फत एडीओची भरती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरतीतील बीड जिल्ह्यातील नऊ महिन्यापासून कार्यरत असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सला सुरुवातीला नऊ हजार रुपये पगार ठरला व प्रत्येक महिन्याला १६०० रुपयांचा पीएफ कपात होत गेला पण पगारच देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचा पगार थकविणाऱ्या कंपनीवर शासन कोणती कारवाई करणार आहे व या कर्मचाऱ्यांना त्यांचा पगार देण्याबाबत कोणती उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२२-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कंपनीने काही अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना एप्रिल २०१४ पर्यंत वेतन अदा केले असल्याचे कळविले आहे. परंतु मे २०१४ पासून कंपनीने अकाऊन्टंट कम डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना वेतन अदा केलेले नाही.

(३) अखिल भारतीय एडीईओ संघटना परिसंघ व मे.ईगल सिक्युरिटी अँण्ड पर्सनल सर्विसेस, मुंबई यांच्या अधिकाऱ्यांसोबत दि.३१.१.२०१५ रोजी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत मिळालेल्या हजेरीपत्रकामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी असल्याचे सेवापूरवठादारांनी नमूद केले. त्यामुळे जिल्हास्तरावर समिती गठीत करुन सर्व हजेरीपत्रकांची पडताळणी करुन सुधारीत हजेरीपत्रक लवकरात लवकर राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्षाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार जिल्हास्तरावर समिती गठीत करुन माहे फेब्रुवारी, २०१४ ते जानेवारी २०१५ ची हजेरी पडताळणी करण्यात आली. सुधारीत हजेरीपत्रकांनुसार सेवापूरवठादारास अदा करावयाच्या देयकापेक्षा दंडाची रक्कम जास्त असल्याचे दिसून आले.

दरम्यानच्या काळात सदर सेवापूरवठादाराने निविदेतील काही अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे त्यांना दि.१ ऑक्टोबर, २०१४ पासून त्यांचा करार रद्द करण्यात येत असल्याबाबत तसेच त्यांची सुरक्षा ठेव जप्त करण्याबाबत कळविण्यात आले. यावर सेवापूरवठादारने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आब्रीट्रिशन याचिका दाखल केली व सदर याचिकेस अनुसरुन मा.उच्च न्यायालयाने सेवापूरवठादाराविरुध्द करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. सदर याचिके संदर्भातील कार्यवाही मा.उच्च न्यायलायामध्ये प्रगतीपथावर आहे.

---

## मावळ (जि.पुणे) तालुक्यातील कुरवंडे गावातील खाजगी वन विभागाची नोंद रद्द न करण्याबाबत

**(२) ३३६२१ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील कुरवंडे गावातील सर्वे नं.१२४ मधील ५९ एकर ५ गुंठे जमीनीवरील असलेली खाजगी वन विभागाची नोंद रद्द करुन नये, यासाठी वन खात्याने दिलेला फेर विचाराचा अर्ज मावळच्या प्रांताधिकारी यांनी कालबाहय ठरवून रद्द केल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी फेरविचार अर्ज दाखल करण्यास वन विभाग अधिकाऱ्यांनी वर्षभर विलंब लावल्याने सदर अर्ज दाखल केल्यानंतर सुनावणीला अधिकारी व वकिलांची गैरहजेरी तसेच वन नोंदीची सबळ पुरावे देण्यास दुर्लक्ष, केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार वन व महसूल विभागाचे संबंधित दोषी असणाऱ्या अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे व, सदरहू जमिनीवर वन विभागाची नोंद कायम ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाय योजना करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्यापी, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

वन विभागाने उपविभागीय अधिकारी मावळ यांचे न्यायालयात दाखल केलेला पुर्नविलोकन अर्ज अपिल दि. ३१.७.२०१५ रोजीच्या निर्णयाद्वारे फेटाळण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

मुळ आर टीएम अपिल क्र. ८५/२००६ मध्ये उपविभागीय अधिकारी यांनी खाजगी वन अधिनियमातील तरतूदीस अधिन हा शेरा कमी करणेबाबत नव्याने फेरफार नोंदविण्यात यावा असा आदेश दि. २१.५.२०१२ रोजी दिला होता. सदर निर्णयाविरुध्द वन विभागाने शासकीय

महसूल अधिलेखा वरुन "वने" ची नोंद कमी करण्यासाठी केंद्रशासनाची पूर्व परवानगी बंधनकारक असल्याच्या मुद्याच्या आधारावर पुनर्विलोकन अर्ज क्र. ९३२/२०१३ दिनांक १०.८.२०१३ रोजी दाखल केला होता. उपविभागीय अधिकारी यांचेकडून दि. ३१.७.२०१५ चे निर्णयान्वये पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात आला.

(३) वन विभागाने उपविभागीय अधिकारी यांचे आदेशाविरुध्द महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे अपिल दाखल केले असल्याने कोणत्याही अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही केलेली नाही. या अपिलात वने ची नोंद शासकीय महसूल अभिलेखावरुन कमी करण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी प्रमाणे केंद्रशासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याची बाब नमूद केली आहे. सदर अपिल सुनावणीवर प्रलंबित आहे.

(४) विलंब झालेला नाही.

पुनर्विलोकन अर्ज दि. ३१.७.२०१५ रोजी फेटाळल्यानंतर मुदतीत वन विभागाने उपविभागीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द अपर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या कोर्टात महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदी अन्वये अपिल केले असून प्रकरणी सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

---

**श्रीगोंदा तालुक्यातील (जिल्हा अहमदनगर) पेंडगावंमध्ये इक्बाल वस्ती येथे असलेल्या अंगणवाडी शाळेत सुर्यकांताच्या मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप केल्याबाबत**

**(३) ४२५८६ (३०-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा तालुक्यातील (जिल्हा अहमदनगर) पेंडगावंमध्ये इक्बाल वस्ती येथे असलेल्या अंगणवाडी शाळेत सुर्यकांताच्या मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप करण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुदतबाहय शेंगदाणा चिक्कीचे वाटप थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

तथापि, पेंडगाव ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर येथील वस्तीतील अंगणवाडी केंद्रामध्ये सुर्यकांता कंपनीच्या मुदतबाह्य झालेल्या शेंगदाणा चिक्कीचे वाटप करण्यात आले या आशयाचे वृत्त दि. १५/०८/२०१५ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले. त्यानुसार बाल विकास प्रकल्प, श्रीगोंदा यांनी पेंडगाव येथील अंगणवाडी केंद्र क्र. २९४ ला संबंधित पर्यवेक्षिका समवेत पाहणी केली असता सदर अंगणवाडी केंद्रामध्ये समवेत पाहणी केली असता सदर

अंगणवाडी केंद्रामध्ये एकी गुळ शेंगदाणा चिक्कीचे पाकीट आढळून आले नाही. संबंधित अंगणवाडी केंद्रास वाटप करण्यात येणारे ८० चिक्की पाकीटे देण्यात आले होते. सदर चिक्कीचे दि. १७/५/२०१५ व दि. १८/५/२०१५ या कालावधीत वाटप करण्यात आले. दि. ३/७/२०१५ रोजी सदर अंगणवाडी केंद्रास संबंधित पर्यवेक्षिका यांनी भेट दिली असता अंगणवाडी केंद्रात कोणत्याही प्रकारची चिक्की शिल्लक नसल्याबाबत शेरेपुस्तकात नोंद केलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या जलसंधारण विभागास गेल्या वर्षभर निधीचा उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याबाबत**

**(४) ४२९४६ (२९-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या जलसंधारण खात्यास गेल्या वर्षभर निधीच उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध नसल्याने अनेक विकासाची कामे ठप्प झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील अनेक कामांच्या देयकांचे प्रस्ताव महाराष्ट जलसंधारण महामंडळाकडे प्रलंबित असून उर्वरित कामांसाठी निधी मागणीचे प्रस्तावावर अद्याप निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने निधीची तरतूद केली आहे काय ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.
मात्र जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाशी संबंधित असलेल्या महाराष्ट्र जलसंधारण महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० मधील कलम २५ (१) मध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने, महामंडळाकरीता सन २०१५-१६ मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नव्हता.
(३) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात महामंडळाअंतर्गत सर्व योजनांकरिता करण्यात आलेली रुपये ७५.०० कोटीची तरतुद वितरीत करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. या प्रस्तावात कोल्हापूर जिल्हयातील योजनांकरिता निधी प्रस्तावित करण्यात आलेला आहे.
(४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात महामंडळाकरीता रुपये ७५.०० कोटी निधीची तरतुद केली असून उर्वरित रुपये २५२ कोटी नियतव्ययापैकी रुपये १५० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील गिट्टी क्रशर व्यवसायाची जमिन वन जमिन सदरात मोडत असल्याबाबत

**(५) ४५३६३ (२०-०४-२०१६). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती तालुक्यातील (जि.चंद्रपूर) येथील गिट्टी क्रशर व्यवसायाची जमीन हि "वनजमीन" सदरात मोडत असल्याने सदर गिट्टी क्रशर बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील लॅटराईड व ईतरखाली हि वनजमीन क्षेत्रात सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गिट्टी क्रशर क्षेत्रातील वनजमीनी सदरा खाली दोन वेगळे निकष महाराष्ट्र शासनाकडून ठरविले जात आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या बंद गिट्टी क्रशर मुळे वन व महसुल विभागाचे महिन्याकाठी अंदाजीत १.०० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे. हैद्राबाद शासनाची अधिसूचना क्रमांक २६० दिनांक २५.०९.१९५३ च्या अधिसूचनेनुसार माणिकगड राखीव वनाचे बहुतांश क्षेत्र जिवती तालुक्यात अंतर्भूत आहे. मध्ये चांदा वन विभागातील माणिकगड वनक्षेत्रात ७ गिट्टी क्रशर सुरु होते. गिट्टीक्रशर लिजची कालावधी संपुष्टात आल्याने वनक्षेत्रातील गिट्टी क्रशर बंद आहेत.

(२) लॅटराईट वापराकरिता (१) वनरसी मायनिंग कंपनी पडोली चंद्रपूर मौजा बेलगांव सर्व्हे नंबर २५, (२) शिवकृपा मिनरल्स चंद्रपूर, मौजा खडकी रायपूर सर्व्हे नंतर १०(३) आदित्य मिनरल्स, चंद्रपूर मौजा मरकागोंदी सर्व्हे नंबर ११७ ता.जिवती जि.चंद्रपूर यांना खाण कामाकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी लिज मंजूर केलेली आहे. सदर लिजचे क्षेत्र हैद्राबाद शासनाची अधिसूचना क्रमांक २६० दिनांक २५.९.१९५३ नुसार माणिकगड ब्लॉकचे राखीव वनात समाविष्ट आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी, जिवती यांनी सदर खाणकाम बंद करण्याबाबत लिज धारकांना नोटीस देवून खाणकाम बंद केले असता संबंधित लिज धारकांने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका क्रमांक १९०/२०१६, १९२/२०१६ व १९३/२०१६ दाखल करुन वन विभागाच्या कार्यवाहीस स्थगिती प्राप्त केलेली आहे.

(३) वन विभागाकडील दस्ताऐवजाप्रमाणे सदर खाणकामाचे क्षेत्र माणिकगड राखीव वनाचे वनक्षेत्रात आहे. महसूल विभागाच्या अभिलेख्याप्रमाणे सदर क्षेत्र महसूल विभागाचे क्षेत्र असल्याचे महसूल विभागाचे म्हणणे आहे. रिट याचिका क्रमांक ३६६९/२००९ मध्ये करण्यात आलेल्या डाटाएंट्रीप्रमाणे खाण क्षेत्र विवादीत क्षेत्राच्या प्रकारात मोडत असल्याने मुख्य सचिव, महसूल व वने, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक ९.६.२०१५ च्या पत्रातील सूचनाप्रमाणे विवादीत क्षेत्र "वनक्षेत्र" समजण्यात यावे. अशा सूचना प्राप्त झालेल्या आहेत. वरील निर्णयानुसार विवादीत क्षेत्राबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) गिट्टी क्रशर लिजचा कालावधी संपुष्टात आल्याने कोणतेही आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे टाका (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलावाची दुरुस्ती करणेबाबत**

**(६) ४८२४३ (२९-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे टाका (ता.औसा, जि.लातूर) येथील पाझर तलावांत पावसाचे पाणी थाबंत नसल्यामुळे सदर पाझर तलावाची दुरुस्ती करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास उप अभियंता, लघु पाटबंधारे (जलसंधारण) उपविभाग, औसा, जि.लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलाव दुरुस्तीस किती खर्च येत असून सदर पाझर तलाव दुरुस्तीबाबत बाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) अद्यापी, कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण विभाग लातूर यांनी केलेला अंदाजपत्रकानुसार सदर दुरुस्तीस रु. २८.५२ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी लातूर यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच दुरुस्तीची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे फराडा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) या गावातुन वैनगंगा नदीकडे जाणारे रस्त्यावर पुलवजा बंधाऱ्याचे बांधकामाबाबत**

**(७) ४८५६६ (२९-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे फराडा (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथील या गावातुन वैनगंगा नदीकडे जाणारे रस्त्यावर पुलवजा बंधाऱ्याचे बांधकाम सन २०१४ मध्ये सुरु करण्यात आले असुन अद्यापही हे बांधकाम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकाम बाबत अद्यापही पूर्ण न होण्याचे कारण काय,
(३) असल्यास, कंत्राटदारावर काय कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०९-२०१६) :** (१) होय.

(२) संबंधित कंत्राटदाराने सदर काम फेब्रुवारी २०१६ अखेर पर्यंत बंद ठेवले होते. सध्या बंधाऱ्यांचे बांधकाम सुरु आहे. सदर बांधकाम जून २०१६ मध्ये पूर्ण झाले असून बंधाऱ्यात ऑक्टोबर २०१६ अखरे पाणी साठविण्यात येईल.

(३) व (४) कंत्राटदाराने मंदगतीने बांधकाम केल्यामुळे बंधाऱ्याचे बांधकामास विलंब झाला आहे. सबब संबंधित कंत्राटदारावर दिनांक २०/०९/२०१४ पासून दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी**

**(८) ४८९११ (११-०५-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) येथे वातावरणातील बदलामुळे विविध आजार बळावले जाऊन सद्या ग्रामीण रुग्णालयात एकच डॉक्टर कार्यरत असून वैद्यकीय अधीक्षक वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, कक्षसेवक, सफाईगार अशा एकूण २५ कर्मचाऱ्यांच्या पदांपैकी १२ पदे रिक्त असल्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचाराअभावी रुग्णांचे हाल होत असल्याने सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी तेथील खेड्यापाड्यातील ग्रामस्थांनी माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची सार्वजनिक आरोग्य विभागाने चौकशी करुन रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०९-२०१६) :** (१) होय.

ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड, जि.पालघर येथे वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गाची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १४ पदे भरलेली आहेत तर ११ पदे रिक्त आहेत.

यामध्ये वैद्यकीय अधिक्षक हे पद रिक्त असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मंजूर ३ पदांपैकी २ पदांवर एक स्थायी व एक बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. उर्वरित एका रिक्त पदावर आश्रमशाळा पथक, कासा जि.पालघर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आली आहे.

२ अधिपरिचारीका, १ कनिष्ठ लिपीक व १ प्रयोगशाळा सहाय्यक ही ४ पदे पदोन्नतीमुळे रिक्त आहेत. तर कक्षसेवक सेवेतून काढून टाकण्यात आल्यामुळे सदर पद रिक्त आहे.

(२) वर्ग-१ ची रिक्त पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरणे, गट-अ ची विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मुलाखतीद्वारे भरणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे. वर्ग-३ व वर्ग -४ ची भरण्याबाबतची कार्यवाही उप संचालक स्तरावर चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन बंद असल्याबाबत**

**(९) ५०५३८ (११-०३-२०१६). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन अनेक महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मशीन बंद राहण्याची कारणे काय आहेत तसेच मशीन तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे

(३) अद्यापि, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) होय.

(२) राज्यातील नविन शासकीय धोरणानुसार पी.पी.पी. अंतर्गत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय व एक्स-रे सेवा सुरु करण्यात येणार होती. त्यामुळे जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथील सी.टी.स्कॅन मशीन उपजिल्हा रुग्णाल कळवण, जि.नाशिक येथे स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.

रुग्णालयात दाखल होणाऱ्या अत्यावस्थ रुग्णांस सी.टी.स्कॅन चाचण्या ह्या खाजगी रुग्णालयांतून करुन त्याचा खर्च रुग्ण कल्याण समितीमधून भागाविण्यात येत आहे.

जिल्हा रुग्णालय, अहमदनगर करीता जिल्हा वार्षिक योजना निधीतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून सी.टी.स्कॅन मशीनचा पुरवठा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड तालुक्यातील हळदा डकला या भागातील वाघूर नदीवर**
**साखळी पध्दतीने कोल्हापूरी बांध उभारण्याबाबत**

**(१०) ५१०५१ (२९-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यातील हळदा डकला या भागातून सुमारे १० कि.मी. पर्यत वाघूर नदीवर साखळी पध्दतीने कोल्हापूरी बांध उभारण्याची मागणी येथील ग्रामस्थानी मा.जलसंपदा मंत्री यांना निवेदनाद्वारे केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर शासनाने निर्णय घेवून येथे साखळी पध्दतीने कोल्हापूरी बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद मार्फत हळदा कोल्हापूरी बंधारा क्र. १ व २ तालुका सिल्लोड तसेच डकला कोल्हापूरी बंधारा क्र. १ तालुका सिल्लोड या योजनांचे सर्वेक्षण करुन, सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन, प्रशासकीय मान्यतेसाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद कार्यालयास सादर करण्यात आलेली होती. सदरील कार्यालयास सादर करण्यात आलेली होती. सदरील योजनांना महामंडळाकडून दिनांक १८/८/२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २४/९/२०१५ रोजीच्या ४९ व्या बैठकीत दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या १२०० योजना तसेच दिनांक १/४/२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजना परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा एकूण २२३० स्थगिती दिलेल्या योजनांपैकी दिनांक १/४/२०१४ पूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेल्या ११३० योजनांपैकी जलयुक्त शिवार अंतर्गत येणाऱ्या १०१ योजनांची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यास तसेच उर्वरित स्थगिती दिलेल्या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये सदरील योजनांचा समावेश आहे.

---

## रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील बेलदा नदीवर बंधारा बांधून जलसिंचनाची सोय करण्याबाबत

**(११) ५१६४९ (२९-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर रामटेक विधानसभा क्षेत्रातील बेलदा नदीवर बंधारा बांधून आदिवासी कोरडवाहू ६० टक्के क्षेत्रामध्ये जलसिंचनाची सोय करण्याचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-०९-२०१६) :** (१) होय.

(२) सदर निवेदनातील मागणीनुसार शितलवाडी-परसोडा नाला खोलीकरण, रुंदीकरण व संरक्षण भिंत बांधकाम सुरु केले आहे. तसेच बेलदा गावशिवार लगत कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा दुयापार-२ प्रस्तावित केला असून सन २०१६-१७ च्या जिल्हा नियोजन समिती आराखड्यात बेलदा गावशिवार सर्व्हेक्षण करण्याचे प्रस्तावित आहे. सर्व्हेक्षणाअंती बेलदा गावशिवारातील बांधकामे प्रस्तावित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणात झालेली दुरवस्था**

**(१२) ५१८४० (२९-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील बंधाऱ्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०९-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

सदर नादुरुस्त बंधाऱ्यांची लघुसिंचन विभागाकडून पाहणी करण्यात आलेली आहे.

(३) सन २०१२ च्या अतिवृष्टीमुळे काही पाझर तलाव, गावतळे, को.प.बंधारे व साठवण बंधाऱ्याची कामे नादुरुस्त झाली आहेत.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये अनुक्रमे २०८ व ३०९ दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलोरा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील कोल्हापूरी बंधाऱ्याच्या अपुर्ण कामाबाबत**

**(१३) ५२६१३ (२९-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे कामास सुरुवात होवून सहा वर्षापेक्षा जास्त कालावधी होवूनही काम अद्यापर्यंत पुर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम विहीत मुदतीत व निकषानूसार झालेले नसल्याच्या अनेक तक्रारी संबंधीत विभागास व वरीष्ठाकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी करुनही याबाबत शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही संबंधीतांवर करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्यानूसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहे व बेलोरा येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे अर्धवट काम पुर्ण करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्याचे नियोजीत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) तांत्रिक कारणाने योजनेचे कामपूर्ण करणेस विलंब झाला असल्यामुळे या कामास आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. निविदेमधील निकषानुसार काम करण्यात येत असल्याने कोणतीही कार्यवाही संबंधितांवर करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सर्वेक्षण व काम सुरु करण्याच्या दरम्यान योजनेच्या नियोजित स्थळी नदी पात्रात वाळू व गाळ साचल्याने योजनेची जोता पातळी १.५० मी. उंच उचलनेस्तव बेलोरा गावचे समस्त शेतकरी व गावकरी यांनी आग्रही भुमिका मांडली. त्यामुळे योजनेचे काम बंद पाडले. आवश्यकतेनुसार संकल्पीत पाणीसाठा व त्यानुषंगाने जोता पातळी याची पडताळणी कारणे, या बाबींमुळे कालापव्यय झाला, त्यामुळे योजनेचे काम रखडले. या बंधाऱ्याचे बर्गे वगळता उर्वरित काम ९०% पूर्ण झालेले असून येत्या पावसाळ्यापुर्वी योजनेचे काम पूर्ण करुन सन २०१६-१७ मध्ये सिंचनाचा (१५१ हेक्टर) लाभ देणे नियोजित आहे. त्यानुसार संबंधित कंत्राटदारास काम पूर्ण करणेस्तव योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

### उल्हासनगर-३ (जि.ठाणे) येथील रा.का.वि. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता त्यांचे वेतनातून कपात करण्यात येत असल्याबाबत

**(१४) ५२९०६ (११-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर-३ (जि.ठाणे) येथील राज्य कामगार विमा रुग्णालयातील ४४ कर्मचाऱ्यांना जबरदस्तीने शासकीय निवासस्थाने वाटप करुन त्यांचे वेतनातून सन २००३-२००८ पर्यंतचे घरभाडे भत्ता त्यांचे वेतनातून कपात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी आयुक्त, संचालक, वैद्यकीय अधिक्षक रा.का.वि. योजना यांचेकडे निवेदने देण्यात आली आहेत तसेच लोकप्रतिनिधिंनी दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य, यांचेकडेही निवेदन देऊन कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही हे खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.
कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार भाडेमाफ निवासस्थानाचे वाटप केल्यानंतर त्यांना नियमानुसार घरभाडे भत्ता व प्रवास भत्ता देण्यात येत नाही. मात्र जबरदस्तीने निवासस्थानाचे वाटप केले हे म्हणणे वस्तूस्थितीवर आधारीत नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे. मात्र घरभाडे भत्ता मिळण्याबाबत प्रकरण मा.उच्च न्यायालय येथे न्यायप्रविष्ट असल्याने या संदर्भात न्यायालयीन निकालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १३९ जलसंधारण योजनांच्या मान्यतेबाबत**

**(१५) ५२९४० (२९-०४-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३९ जलसंधारण योजनांची मान्यता माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पुन्हा रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात मराठवाड्यातील ५५ तर उर्वरित महाराष्ट्रातील ८४ योजनांचे भवितव्य धोक्यात आल्याने ऐन दुष्काळात पाणी टंचाई होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय.

(२) महामंडळाने दिनांक १४/१०/२०१४ अन्वये दिनांक १/४/२०१४ पासून महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत (विदर्भ वगळून) विविध टप्प्यातील योजनांची पुढील कार्यवाही स्थगित ठेवण्यात आली.

मुख्य अभियंता, पुणे यांनी दिनांक २/५/२०१५ अन्वये जलयुक्त शिवार अभियांनातर्गत एकूण १३९ योजनांवरील स्थगिती उठविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास दिनांक २५/८/२०१५ अन्वये जलयुक्त शिवार अभियांनातर्गत मराठवाडा विभागातील ५५ व उर्वरित महाराष्ट्रातील ८४ अशा एकूण १३९ योजनांची स्थगिती उठविण्यात आली. मात्र जलयुक्त शिवार अभियांनातर्गत निवडलेलया गावातील योजनांची तपासणी करणे आवश्यक असल्याने, दिनांक २५/८/२०१५ अन्वये रद्द करण्यात आला.

दिनांक ८/५/२०१५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळातर्गत दिनांक १/४/२०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतू प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु न झालेल्या तसेच दिनांक १/४/२०१४ नंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतू क्षेत्रिय कामे सुरु न झालेल्या योजनांची तपासणी करण्याबाबत ३ मुख्य अभियंता यांची समिती गठित करण्यात आल. सदर समितीने दिनांक एकूण २३३० योजनांबाबतचा अहवाल दिनांक २८/७/२०१५ रोजी महामंडळास सादर केला. सदर अहवाल संचालक मंडळाच्या दिनांक २४/९/२०१५ रोजीच्या ४९ व्या बैठकीत निर्णयास्तव सादर करण्यात आला. सदर बैठकीत २३३० योजनांपैकी जलयुक्त शिवार अभियांनातर्गत १०१ योजना वगळता २२२९ योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१३९ योजनांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

१. ४४ योजना सद्यस्थितीत प्रगतीपथावर आहेत.
२. ७२ योजना संचालक मंडळाने प्रशासकीय मान्यता रद्द न करण्याच्या निर्णयानुसार कायम ठेवावयाच्या १०१ योजनांमध्ये समाविष्ट असल्याने पुढील प्रक्रिया सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.
३. २३ योजनांचा संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता रद्द करावयाच्या २२२९ योजनांमध्ये समावेश आहे. या योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे विरहाम (ता.खेड, जि.पुणे) येथे आदिवासी उपाययोजना अंतर्गत पाटबंधारे विभागाने बांधलेल्या पाझर तलावाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) ५३०८६ (०६-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विरहाम (ता.खेड, जि.पुणे) येथे आदिवासी उपाययोजना अंतर्गत छोटे पाटबंधारे विभागाने बांधलेला पाझर तलाव दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास फुटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाझर तलाव फुटून ७ विहिरी गाडल्या जाऊन १५० शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०२-०८-२०१६) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. सदरचा पाझर तलाव फुटून मौजे विरहाम येथील ८ व मौजे भलवडी येथील २ असे एकूण १० विहिरींचे व ३१ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे.

(३) कंत्राटदारावर कारवाई प्रस्तावित असून ठेकेदारास कारणे दाखवा नोटिस दिली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पूर्व मेळघाट वनविभागाच्या खिर्कुंद जंगलात सागवान तस्करांनी वन कर्मचाऱ्यांवर दगडफेक केल्याची घटना

**(१७) ५३७०३ (२४-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व मेळघाट वनविभागाच्या खिर्कुंद जंगलात सागवान तस्करांनी वन कर्मचाऱ्यांवर दगडफेक केल्याची घटना माहे एप्रिल २०१६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमध्ये वन कर्मचारी जखमी झाले आहेत काय,

(३) असल्यास, दगडफेक करणाऱ्या तस्करांना पकडले आहे काय,

(४) असल्यास, सदर तस्करांवर काय कारवाई केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर घटनेमध्ये कोणतेही अधिकारी किंवा वनमजुर जखमी झालेले नाही.

(३) सदर प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. फरार आरोपीचा शोध घेण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी वनगुन्हा नोदविण्यात आली असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीस मा.न्यायालय, दर्यापूर यांचे न्यायालयात हजर केले. त्यास मा.न्यायालयाचे आदेशानुसार वनकोठडीत ठेवण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील वरुड वनपरी क्षेत्रामध्ये हेलिकॉप्टर मधून जंगलात आगीचे गोळे टाकल्याने २५ एकर जंगल बेचिराख झाल्याबाबत**

**(१८) ५३८८० (२४-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील वरुड वनपरी क्षेत्रामध्ये दिनांक ६ एप्रिल २०१६ रोजी हेलिकॉप्टर मधून जंगलात आगीचे गोळे टाकल्याने २५ एकर जंगल बेचिराख झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगीचे गोळे फेकणारे ते पांढऱ्या रंगाचे हेलिकॉप्टर मध्यप्रदेश सीमेतून आले असल्याचा संशय येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, आगीचे गोळे फेकण्याचे नेमके कारणांचा शोध लागला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :** (१) व (२) अमरावती वन विभागांतर्गत वरुड परिक्षेत्रातील पुसला वर्तुळातील व पुसला नियत क्षेत्रातील मौजे हुमणपेठ येथील वनखंड क्र.१०९४ मध्ये दि. ६ एप्रिल, २०१६ रोजी १०.०० हे क्षेत्र जळाले हे खरे आहे.

हया संदर्भात घटना स्थळावर उपस्थित काही इसमांचे बयानानुसार मध्यप्रदेश क्षेत्र सीमेतून हेलीकॉप्टर आढळून आले. पण त्याचा ठोस पुरावा नाही.
(३) दिनांक ७.४.२०१६ ला पोलीस स्टेशन शेंदूरजणाघाट येथे रिपोर्ट दाखल करण्यात आला आहे. आग लागल्याचा वनगुन्हा दिनांक ६.४.२०१६ रोजी जारी करण्यात आला असून सदर वनगुन्हयात अंदाजे १०.०० हे क्षेत्र जळाले असून त्यात कोणत्याही मनुष्य/वन्यप्राण्याची जीवीत हानी झालेली नाही.
(४) व (५) आगीचे गोळे फेकण्याच्या नेमक्या कारणांचा शोध लागलेला नाही तथापि वर स्पष्ट केल्याप्रमाणे चौकशी तपास सुरु आहे.

---

## नागपूर जिल्हयातील उमरेड तालुका कऱ्हांडला अभयारण्यात सागवान वृक्षाची तस्करी होत असल्याबाबत

**(१९) ५३९६० (२४-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि. नागपूर) तालुक्यातील कऱ्हांडला अभयारण्यातील चारशेच्यावर सागवानाच्या लाकडांची तस्करी करण्यात आल्याबाबतची बाब माहे मे २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभयारण्याच्या परीसरात सागवानाच्या लाकडाशिवाय इतरत्र जातीच्या एक हजारपेक्षाही अधिक महागड्या लाकडांची सुध्दा मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करुन अवैध विक्री करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सागवान लाकडाची वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने जळाऊ लाकडामध्ये चुकीची नोंद घेऊन त्याची बाजारभावात विक्री करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अवैध सागवानाच्या लाकडांची तस्करी करणाऱ्या लाकुड तस्करांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या वनधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) वन अधिकारी व कर्मचारी यांचे तस्करीसोबत काहीही संबंध निदर्शनास न आल्यामुळे वन अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कर्जत तालुक्यातील कशेले येथे बांधण्यात आलेल्या पाझर तलावाची देखभाल व दुरुस्तीअभावी झालेली दुरवस्था

**(२०) ५४९८६ (२४-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत सन १९८० मध्ये कर्जत तालुक्यातील कशेले येथे पाझर तलाव बांधण्यात आला असून सदरहू पाझर तलावाच्या देखभाल व दुरूस्ती अभावी दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तलावातून जेसीबी लावून सर्रासपणे मातीचे उत्खनन करण्यात येत असल्याने पावसाळयात सदर पाझर तलाव शेतीसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता असल्याने तेथील शेतकऱ्यांनी मागील १ वर्षापासून सातत्याने लघुपाटबंधारे विभागाकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करूनही सदरहू तलावाची आजमितीस दुरूस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या तक्रारीनुषंगाने कशेले पाझर तलावाच्या दुरूस्तीचे काम आजमितीस हाती न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू पाझर तलावाच्या दुरूस्तीचे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

साठवण तलाव कशेले ता.कर्जत येथील पाझर तलाव सुस्थिती आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उप अभियंता व शाखा अभियंता, उप विभाग कर्जत यांनी दिनांक ७/९/२०१६ रोजी तलाव क्षेत्राची पाहणी केली आहे. सदर तलाव क्षेत्रात उत्खनन करण्यात आलेले नसून खाजगी मालकीच्या जागेत उत्खनन करण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील मालेगांव शहरातील १०० टक्के आरा गिरण्या बाभुळ, निलगिरी, निंब, सुबाभुळ, यासारख्या आडजात वृक्षांची तोड केल्याबाबत**

**(२१) ५५१४७ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगांव शहरातील १०० टक्के आरा गिरण्या बाभुळ, निलगिरी, निंब, सुबाभुळ, यासारख्या आडजात वृक्षांची सर्रास तोड करुन त्यातील २०० घनमिटर लाकडाची दरवर्षी विनाहॅमर वाहतूक करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात अपर प्रधान मुख्य वन संरक्षकांनी राज्यातील प्रादेशिक मुख्य वन संरक्षकांकडून, वारंवार अहवाल सादर करण्याचे आदेश देवूनही अद्‌याप शासनास अहवाल सादर न करण्याची, सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच, येथील आरा गिरण्यांमध्ये ८ लक्ष घनमीटर लाकडाच्या महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ च्या नियम २५ नुसार स्वामित्व प्रमाणपत्र उपलब्ध नसतांनाही अद्‌याप वन विभागाच्या संबंधित अधिका-याने सुमारे ४ हजार संशयित आरा गिरण्यांची अद्‌याप शासनाने चौकशी व कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार किती व कोणत्या आरा गिरण्यां तसेच त्यांना संरक्षण देणा-या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द अद्‌याप शासनाने कोणती कायदेशीर कारवाई केली आहे. नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयाकडील पत्र दिनांक २२.१.२०१५ अन्वये राज्यातील इतर वनविभागांना वाहतूक परवान्यावर व लाकडांवर निर्गत शिक्का उमटविणे व लॉगिंग लिस्ट जोडणे अनिवार्य असल्याबाबत कळविण्यात आलले आहे. परंतु याबाबत कोणताही अहवाल सादर करण्याबाबत कळविलेले नाही.
(३) प्रश्नामध्ये नमूद महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ अन्वये कार्यवाही महसूल अधिकारी यांचेकडून करण्यात यत असल्याने संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील ४१९१ परवाना आरागिरण्यावर कार्यवाही / चौकशी करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे टेंभीखोडावे (ता.सफाळे, जि.पालघर) येथील साठवण/पाझर तलावाच्या प्रलंबित कामाबाबत**

**(२२) ५५७९७ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे टेंभीखोडावे, सफाळे (जि.पालघर) येथील साठवण /पाझर तलावाचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे मे २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे जा.क्र.ठालपावि/प्रशा-२/४८१/२०१३ अन्वये कार्यकारी अभियंता, ठाणे लघुपाटबंधारे विभागाकडून सर्वेक्षण होऊन सुध्दा अद्यापपर्यंत काम बंद आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयास लघु पाटबंधारे विभाग, कळवा ठाणे यांचे क्र. ठालपावि/प्रशा-२/४८१/२०१३, दिनांक ८/२/२०१३ चे पत्रान्वये सदर साठवण तलावाचे अंदाजपत्रक प्रचलित मापदंडात बसत नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे मौजे टेंभीखोडावे, सफाळे (जि.पालघर) येथील पाझर तलाव / साठवण तलाव बांधणे या कामाची सुरुवात करण्यात आलेली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोयगांव तालुक्यात (जि.औरंगाबाद) अंजिठा वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ठाणा (मा.सोयगांव) शिवारातील राखीव जंगलाला चर पाडून हद्दीचे कामे मनरेगा अंतर्गत न करता जेसीबीमार्फत वनविभागाने केल्याबाबत**

**(२३) ५६०२६ (२४-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगांव (जि.औरंगाबाद) तालुक्यात भीषण दुष्काळ परिस्थिती असताना अंजिठा वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ठाणा (मा.सोयगांव) शिवारातील राखीव जंगलाला चर पाडून हद्दीचे कामे मनरेगा अंतर्गत न करता जेसीबीमार्फत वनविभागाने केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील वनविभागाच्या कारभाराची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केला वा करण्यात येत आहे

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर कामाचे अंदाजपत्रकामधील गुरे प्रतिबंधक चराच्या बाबीस जलसंपदा विभागाच्या सामाईक दर सूची सन २०१३-१४ च्या आधार घेतला असल्याचे दिसून येत आहे. या अंदाजपत्रकास वनपरिक्षेत्र अधिकारी, अजिंठा यांनी तांत्रिक मान्यता दिली असून सहायक वनसंरक्षक, सिल्लोड यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. वास्तविक वन विभागाकडील रोपवन विषयक मान्य नमुन्यांमध्ये गुरे प्रतिबंधक चर खोदण्याचे काम अकुशल मजुरीचे आहे. तथापि वनपरिक्षेत्र अधिकारी, अजिंठा यांनी जलसंपदा विभागाकडील दरसूचीचा आधार घेतला आणि अंदाजपत्रकात यंत्राद्वारे गुरेप्रतिबंधक चर करण्याची तरतूद केली. याबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी अजिंठा व सहायक वनसंरक्षक, सिल्लोड यांना कारणे दाखवा नोटीस देऊन स्पष्टीकरण मागविण्यात आले असून त्या अनुषंगाने वन परिक्षेत्र अधिकारी, अजिंठा यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ चे नियम १० अंतर्गत शिस्तभंग विषयक कारवाईसाठी दोषारोप पत्र बजावण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साक्री तालुक्यातील बर्डीपाडा तसेच कोंडाईवारी रेंज अंतर्गत गुलतारे, रायकोट, लगडवाळ गाव शिवारातील जंगलात अनधिकृत वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(२४) ५६२३४ (२४-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यातील, पिंपळनेर रेंज अंतर्गत करंझटी, मळगावं, डोंगरपाडा, उमरपाटा पैकी बर्डीपाडा तसेच कोंडाईबारी रेंज अंतर्गत, गुलतारे, रायकोट, लगडवाळ गाव शिवारातील जंगलाची मोठ्या प्रमाणात अनधिकृत वृक्षतोड होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुलतारे व रायकोट परिसरात अनधिकृत जंगलतोड करणाऱ्या व्यक्तींविरुध्द वनखात्यामार्फत कारवाई होत नाही म्हणून पोलीसांच्या मदतीने संबंधिताविरुध्द कारवाई वृक्षतोड थांबवावी असा अहवाल दिनांक २२ जानेवारी, २०१६ व १ जून, २०१६ वा त्यासुमारास पोलीस अधिक्षक धुळे यांना विभागीय वनधिकारी धुळे यांनी सादर केला असून अद्याप त्याबाबतीत काही एक कारवाई होत नसल्यामुळे पिंपळनेर व कोंडाईबाई रेंजअंतर्गत बऱ्याच गांवाना अद्यापही अनधिकृत जंगलतोड सुरु आहे याबाबत शासन आवश्यक कारवाई करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-१०-२०१६) :** (१) धुळे वनविभाग साक्री तालुक्यातील पिंपळनेर वनक्षेत्र मौजे करंझटी, मळगाव, डोंगरपाडा उमरवाटा पैकी बर्डीपाडा येथील कं.नं.१८८, १८९, १९० मध्ये अवैध वृक्षतोड झालेली असून साग बुडे ९३१ व इंजा बुडे २६८ बुडांची तोड माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ मध्ये झालेली आहे कोंडाईबारी वनक्षेत्रातील मौजे गुलतारे, रायकोट व लंगडवाळ येथे अवैध वृक्षतोड झालेली असून साग बुडे १४०९ व इंजा. बुडे ३०४ बुडांची तोड माहे जून, २०१६ मध्ये झालेली आहे.

(२) अवैध वृक्षतोडीबाबत धुळे वनविभागामार्फत दिनांक २२ जानेवारी ते १ जून, २०१६ च्या दरम्यान जिल्हा पोलीस अधिक्षक धुळे यांना तीन वेळा कळविण्यात आलेले आहे. पिंपळनेर व कोंडाईबारी रेंज अंतर्गत बऱ्याच गावातील अनधिकृत जंगलतोड थांबविण्याकरीता शासन आवश्यक त्या कारवाई करीत असून रेंज स्टाफसह नियमित गस्त करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंगला वन विभागाने घातलेली बंदी

**(२५) ५६३४० (२४-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील माथेरान जिल्ह्यातील हे पर्यटनाचे तसेच रोजगाराचे प्रमुख साधन असल्याने स्थानिक तरुणांनी माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंग या साहसी खेळाच्या माध्यमातून व्यवसय सुरु केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंगला वन विभागाने बंदी घातल्याने तेथील स्थानिक सुशिक्षित तरुणांचा रोजगारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या साहसी खेळाच्या माध्यमातून निर्माण केलेली संधी वनविभागने बंदी घालण्याची कारणे काय आहेत
(४) असल्यास, याबाबत उपरोक्त बंदी उठवून बंदी पुर्ववत या व्यवसायाला परवानगी देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-१०-२०१६) :** (१) माथेरानमध्ये व्हॅली क्रॉसिंगचे काम २०१३-१४ मध्ये करण्यात आले होते, हे खरे आहे .
(२) माथेरानमध्ये अनधिकृतरित्या व्हॅली क्रॉसिंगचे काम सुरु झाल्यानंतर ते तात्काळ बंद करण्यात आले आहे, त्यामुळे या कामासाठी वन विभागाने बंदी घातल्याने तेथील स्थानिक सुशिक्षित तरुणांचा रोजगारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.
(३) भारतीय वन अधिनियम १९२७ व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार राखीव वन क्षेत्रात कोणत्याही वनेतर कामांना तसेच प्रवशास बंदी आहे. या कायद्यांनुसार वन क्षेत्रामधे कोणतीही वनेतर कामे करण्यापूर्वी केंद्र शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. माथेरान येथे पूर्व परवानगी न घेता वनेतर काम केल्याने वनक्षेत्रातील अतिक्रमणेक निष्कासीत करण्यात आलेली आहेत.
(४) व (५) भारतीय वन अधिनियम १९२७ व वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीनुसार वन क्षेत्रामध्ये वनेतर कामे करण्यास केंद्र शासनास पूर्व परवानगी आवश्यक आहे. तथापि असे प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

---

**ठाणे येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या कार्यक्षेत्रातील मानपाडा परिसराला पर्यटन विभाग जाहीर करुनही पर्यटकांना वन पर्यटनापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(२६) ५६५९६ (२४-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या कार्यक्षेत्रातील मानपाडा परिसराला पर्यटन विभाग जाहीर करुनही पर्यटकांना वन पर्यटनापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच ठाणे येथील निसर्गरम्य संजय गांधी राष्ट्रीय उद्यानंतर्गत मानपाडा परिसरामध्ये पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

मानपाडा हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील करमणुक क्षेत्र (Recreational Zone) पैकी एक क्षेत्र आहे. मानपाडा येथे निसर्ग निरीक्षण, निसर्ग भ्रमंती, फुलपाखरु उद्यानात फुलपाखरु निरीक्षण, SLIDES SHOW इत्यादी करण्यात येत आहे. येथे निसर्गप्रेमी व विद्यार्थ्यांकरिता दोन DORMITORIES उपलब्ध आहेत. पर्यटकांना निसर्ग परिचय केंद्रामार्फत वन्यजीव व पर्यावरणपूर्वक माहिती देण्यात येते.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा मार्गावर (जि.बुलढाणा) शेकडो झाडे अनधिकृतपणे विनापरवाना तोडण्यात येत असल्याबाबत**

**(२७) ५६७६६ (२४-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा मार्गावर (जि.बुलढाणा) मोबाईल कंपनीद्वारे खोदकाम केली जात असून यामध्ये शेकडो झाडे अनधिकृतपणे विनापरवाना तोडण्यात येत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी या कार्यालयास तक्रार प्राप्त झालेली नसल्याने चौकशी करुन कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे अंत्री खेडेकर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील म्हसोबाच्या पाझर तलावात करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२८) ५६८२५ (२३-०८-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अंत्री खेडेकर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील म्हसोबाच्या पाझर तलावात करण्यात आलेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची तक्रार माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बुलढाणा यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात सदर प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नाही तर दिनांक १० जून, २०१६ रोजीपासून अंत्री खेडेकर ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार म्हसोबाच्या पाझर तलावाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) उप विभागीय अधिकारी जिल्हा परिषद सिंचन उपविभाग बुलडाणा व उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद, सिंचन उपविभाग, देऊळगांव राजा यांच्यामार्फत दिनांक १४/३/२०१६ रोजी चौकशी करण्यात आली आहे. सदर काम हे पाझर तलावाचे दुरुस्तीचे नसून गाव तलावाच्या दुरुस्तीचे आहे. काम सुरु झालेले असून अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे. मुख्य बांधाचे भरावाच्या पुर्नस्थापनेचे काम समाधानकारक झालेले असून निकृष्ट दर्जाचे झालेले नाही. पावसाळा असल्याने सध्या काम बंद आहे.पावसाळा संपल्यावर कामपूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज तालुक्यातील (जि.कोल्हापूर) हिरलगे-कोवाडे बंधाऱ्यांचे काम दहा वर्षापासून रखडले असल्याबाबत**

**(२९) ५७००६ (२४-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज तालुक्यातील हिरलगे-कोवाडे बंधाऱ्यांचे काम निधी अभावी रखडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बंधाऱ्यास निधी उपलब्ध करुन सदर बंधाऱ्याचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
सदर बंधाऱ्याचे काम तातडीने करण्याबाबत मा.मंत्री जलसंपदा यांना चंदगडचे लोकप्रतिनिधी दिनांक १५/६/२०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे.

(३) सदर योजना जिल्हा नियोजन समितीकडील निधी स्त्रोतामधून प्रगतीत आहे. सदर बंधारा हिरण्याकेशी नदीवर असून या योजनेच्या वरील बाजूस असलेला चित्री माध्यम प्रकल्प पूर्ण झाल्यापासून नदीमधील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या साखळीमुळे सतत बारमाही प्रवाह असतो. योजनेच्या खालील बाजूस असलेल्या ऐनापूर कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यामध्ये लाभ धारकांच्या मागणीनुसार चित्री माध्यम प्रकल्पामधून वारंवार पाण्याचा विसर्ग सोडण्यात येतो. त्यामुळे प्रकल्पक्षेत्रावर नदीमध्ये सतत सुमारे १.५० ते २.०० मिटर स्थिर पाणी असते. त्यामुळे नदीपात्रामध्ये काम करण्यासाठी खूपच कमी कालावधी मिळत असल्याने कामास विलंब होत आहे. तथापि ठेकेदाराकडूनही कामाची उचित प्रगती न राखल्यामुळे त्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे. सद्य:स्थितीत नदीपात्रातील संपूर्ण लांबीतील अडचणीचे पायाचे (Foundation) काम पूर्ण झाले असून एकूण सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. कामावर सुधारित प्रशासकीय मान्यतेइतका रुपये २३२.०० लक्ष खर्च झाला आहे. रुपये ३५१.९० लक्ष रकमेचे द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक सादर करण्याची कार्यवाही लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, पुणे यांच्याकडे प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक आरोग्य विद्यापीठात परसेवेच्या मोठ्या पदांवर नियुक्ती केल्याबाबत

**(३०) ५७०२६ (२२-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील आरोग्य विद्यापीठात परसेवेत लिपिक, शिपाई यांना सहायक कुलसचिव, उपकुलसचिव, कक्ष अधिकारी, लेखापाल या सारख्या मोठ्या पदांवर नियुक्त करण्यात आल्याची तक्रार विद्यापीठाकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, शासनाने चुकीच्या पध्दतीने केलेल्या नियुक्त्यांसदर्भात जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे तसेच सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-११-२०१६) :** (१) नाही. विद्यापीठात परसेवेत (Foreign service) नियुक्ती झालेली नाही.
(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (नाशिक) तालुक्यातील अंजन-वडेल येथे मोसम नदीच्या पात्रात साठवण बंधाऱ्यांचे काम निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३१) ५७८१३ (२४-०८-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (नाशिक) तालुक्यातील अंजन-वडेल येथे मोसम नदीच्या पात्रात साठवण बंधाऱ्यांचे कामे निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याने परिसरातील ग्रामस्थांना भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील साठवण बंधाऱ्याच्या कामास निधी उपलब्ध करुन देऊन बंधाऱ्यांचे काम तात्काळ पूर्ण करणेबाबत शासनामार्फत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप पावेतो काही कार्यवाही नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) हे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे.

(२) या कामाचे प्रथम देयक रुपये ५३.३० लक्ष दिनांक १७/४/२०१५ रोजी तसेच सदर कामाचे दुसरे चालू देयक रुपये ५६.४१ लक्ष दिनांक ७/७/२०१६ अन्वये प्रदान करण्यात आले आहे. पावसाळा संपल्यानंतर कामास सुरुवात करण्यात येणार आहे. बंधाऱ्याचे काम निधी उपलब्धतेनुसार मार्च, २०१७ अखेर पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिसंगी (ता.पंढरपूर) या ३० हेक्टरवरील वनक्षेत्रात वनविभागाच्या देखभाली अभावी झाडांची संख्या घटल्याबाबत**

**(३२) ५८२१४ (२४-०८-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिसंगी (ता.पंढरपूर) या ३० हेक्टरवरील वनक्षेत्रात वनविभागाच्या देखभाली अभावी झाडांची संख्या घटली असून वन्यप्राणी, पक्षी परागंदा झाले असल्याचे माहे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे नवीन वृक्षलागवड करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हवेली (जि.पुणे) तालुक्याअंतर्गत खडकवासला भागात वन विभागांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्याबाबत

**(३३) ५८३०८ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्याअंतर्गत खडकवासला भागात वन विभागांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून येत असल्याचे जून २०१६ मध्ये निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यात अवैधरित्या होत असलेली वृक्षतोड

**(३४) ५८६०६ (२४-०८-२०१६). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील सार्वजनिक ठिकाणी व ग्रामीण भागात परवानगी शिवाय मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असून त्याकडे वन विभाग जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ अखेर निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कारवाई करण्यात आली आहे,
(४) अद्याप चौकशी वा कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.पुणे) तालुक्यातील वनांना वारंवार आग लागत असल्याबाबत

**(३५) ५९४१४ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यात (जि.पुणे) सायगाव, वेताळे आणि साबुर्डी या गावांच्या हद्दीतील वनांना आग लागल्याने हजारो हेक्टर वने नष्ट झाल्याचे माहे मार्च २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाकळवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे माहे मार्च २०१६ वा त्यासुमारास वनात आग लागून लहान झाडे, पशु, पक्ष्यांची घरटी, सूक्ष्म कीटक आणि सरपटणारे प्राणी नष्ट झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनांना आग लागू दुर्मिळ जीव नष्ट होऊ नये याकरिता शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी मौजे वेताळे वन खंड क्रमांक (कंम्पार्टमेंट नंबर) २५३ मध्ये वणवा लागून ४ हेक्टर क्षेत्र जळीत झालेले आहे.
(२) मौजे वाकळवाडी फॉ. क. न. २७५ येथे दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वणवा लागू ३ हेक्टर वनक्षेत्र जळीत झाले असून या वणव्यामुळे लहान झाडे, पशुपक्षांची घरटे, सुक्ष्म कीटके व सरपटणारे प्राणी यांना काही मोठे नुकसान पोहचल्याचे आढळून आले नाही.
(३) वनाला आग लागू दुर्मिळ जीव नष्ट होऊ नये यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्याकडून सतत गस्त घालणे, आगीच्या हंगामात जाळरेषा घेणे, वनसंरक्षण समित्या स्थापन करुन त्या त्या गावातील लोकांच्या सहभागातून वनांचे संरक्षण करणेसारख्या उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

## वैद्यकीय शिक्षणातील अमुलाग्र बदलासाठी डॉ.फडके समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीबाबत

**(३६) ५९६९६ (२२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)वैद्यकीय शिक्षणातील बदलाची गरज लक्षात घेऊन तसेच महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण दर्जेदार होण्यासाठी राज्य शासनाने सन २००८ मध्ये नेमलेल्या नाशिकच्या तत्कालीन कुलगुरू डॉ. मृदुला फडके यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिलेला अहवाल शासनाने स्वीकारला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर अहवालानुसार वैद्यकीय शिक्षणातील अमुलाग्र बदलाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. गिरीष महाजन (०४-११-२०१६) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. अहवालाच्या शिफारशीनुसार प्रत्येक जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचे धोरण असून पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्याबाबत निरंतर सुरू आहे. त्याकरिता निकषानुसार आवश्यक प्राध्यापकीय संवर्गातील पदे निर्माण करून सदर पदभरती निरंतर सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दोडामार्ग व सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) वनविभागात महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम (नियमन) १९६४ चे पालन होत नसल्याबाबत

**(३७) ६०१४२ (२४-०८-२०१६). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने लोटे परशुराम इंडस्ट्रिज असोसिएटेड/आवाज फाऊडेशन या सिव्हील अप्लीकेशन क्र.४०७/२०१२ च्या दिनांक १४ फेब्रुवारी २०१२ ने दाखल दाव्यासंदर्भात दिनांक ११ डिसेंबर २०१४ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन न करता दोडामार्ग (जि. सिंधुदुर्ग) वनवृत्तामध्ये वृक्षतोड चालू असल्याबाबत तसेच सावंतवाडी वनविभागात महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम (नियमन) १९६४ चे पालन होत नसल्याबाबतची सविस्तर लेखी तक्रार उपवन संरक्षक, वन विभाग, सावंतवाडी, मा. प्रधान सचिव, वने यांना दिनांक ३१ मे २०१६ रोजी श्री जयंत राघवेंद्र बरेगार, सायलीवाडा, सावंतवाडी यांने सादर केले आहेत, हे खरे आहे काय

(२) मुंबई उच्च न्यायालयाच्या सदरहू दिनांक ११ डिसेंबर २०१४ च्या आदेशामध्ये संपूर्ण दोडामार्ग तालुक्यामध्ये मोरा टुरियम (Moratorium) चालू राहिल, असा आदेश दिलेला असतानाही डिसेंबर २०१४ ते मे २०१६ या कालावधीत मुंबई उच्च न्यायालयाच्या सदरहू आदेशाचे उल्लंघन करून १०८ प्रकरणामध्ये अवैध मोठया प्रमाणात साग व अन्य निबंधित वृक्षाची तोड व वाहतूक झाल्याची गंभीर तक्रार त्यांनी सदरहू निवेदनात स्पष्टपणे नमूद केलेली आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने सखोल चौकशी करण्यात आली आहे काय

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीविरोधात कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे

(५) अद्याप याप्रकरणी सखोल चौकशी होवून संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-१०-२०१६) :** (१) दिनांक ३१ मे २०१६ रोजीची तक्रार उपवनसंरक्षक सावंतवाडी कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ११.१२.२०१४ च्या आदेशामध्ये भारत सरकार यांचेकडील वन पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय यांचे दिनांक २५.७.२०१४ रोजी केलेल्या OFFICE MEMORANDUM व Annexure-१ मध्ये नमूद केलेल्या गावामध्ये वृक्षतोडीस बंदी केलेली आहे.

१०८ प्रकरणात वृक्षतोडीस परवानगी देणेत आलेली गावे ही मा.मुंबई उच्च न्यायालयाने वृक्षतोड बंदी केलेल्या बंदी केलेल्या गावा व्यतिरिक्त आहे.

(३), (४) व (५) चौकशी करण्यात येत आहे.

---

**राणीचे बांबरूड (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील जुनोने शिवारातील पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(३८) ६१४६३ (२४-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राणीचे बांबरूड (ता.पाचोरा, जि.जळगाव) येथील जुनोने शिवारातील पाझर तलावाचे काम सुरू असून ते काम निकृष्ट होत असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसह ग्रामपंचयात सरपंच व पंचायत समिती सदस्यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजीच्या सुमारास बंद पाडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषी अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) होय. अंशत: खरे आहे.
पाझर तलावाचे काम सुरु असतांना ग्रामपंचायत सरपंच व गावकऱ्यांनी काम सुरु असतांना भेट दिली तेव्हा C.O.T. खोदकाम पूर्ण झाले होते व त्यात काळ्या मातीने भराव करण्याचे काम चालू होते. त्याचवेळी त्यांनी काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे सांगून काम बंद करुन लघु सिंचन, जिल्हा परिषद, विभाग, जळगाव विभागास पत्र दिले होते. उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद लघु सिंचन उपविभाग, भडगाव यांनी तातडीने कामास भेट देवून सरपंच व ग्रामस्थांनी केलेल्या सूचनांनुसार योग्य तीदुरुस्ती संबंधित मक्तेदाराकडून करुन घेतली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य महिला आयोगाची विभागीय पातळीवर कार्यालये सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(३९) ६२४९८ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत तात्काळ कार्यवाही शक्य होत नसल्याने राज्य महिला आयोगाची विभागीय पातळीवर कार्यालये सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१० मध्ये महिला व बाल विकास विभागाकडे पाठवला होता, परंतु सदर प्रस्ताव निर्णयाअभावी अद्याप प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महिला आयोगाला मुख्यालयातून नियंत्रण ठेवणे प्रशासकीय दृष्ट्या शक्य होत नसल्याने सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन आयोगाची विभागीय पातळीवर कार्यालये सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्य महिला आयोगाला मुख्यालयातून नियंत्रण ठेवणे प्रशासकीयदृष्ट्या शक्य होत नाही, अशी वस्तुस्थिती नाही. तसेच विभागीय पातळीवर राज्य महिला आयोगाची कार्यालये सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करता येत नसल्याचे राज्य महिला आयोग यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिवती (जि.चंद्रपूर) येथील पहाडावर शेतकऱ्यांना सिंचनासाठी तलाव बांधण्याचे काम बंद असल्याबाबत**

**(४०) ६२५५० (२३-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) येथील पहाडावर शेतकऱ्यांना सिंचनाची सोय व्हावी म्हणून लघुसिंचन विभागाकडून सुरु असलेले तलावाचे काम बंद करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा तलावाचे काम बंद पडण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या तलावाचे काम तातडीने सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-१०-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) वनपरिक्षेत्र अधिकारी जिवती यांच्या दिनांक ११/०३/२०१६ च्या पत्रान्वये प्रस्तावित तलावाची जमीन वादग्रस्त असून वनविभागातर्फे वनजमिन घोषीत केल्यामुळे केंद्र शासनाची परवानगी प्राप्त करुन पुढील काम करण्यास कळविले असून वन प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथे वनविभागाच्या वतीने मागील दोन वर्षात लागवड केलेली सुमारे १० लाख झाडे दुष्काळमुळे जळून गेल्याबाबत**

**(४१) ६२६१० (२४-०८-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे वनविभागाच्या वतीने मागील दोन वर्षात लागवड केलेली सुमारे १० लाख झाडे दुष्काळमुळे जळाली असल्याचे माहे मे, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील या उर्वरित झाडांचे जनावरांपासून, वृक्षतोडा पासून संरक्षण करण्यासोबतच वनांना आगी लागू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे कवा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

नाशिक वनवृतत्ताअंतर्गत अहमदनगर जिल्ह्यामधील अहमदनगर वन विभाग व संगमनेर उप विभाग यामध्ये वृक्षांची लागवड करण्यात आली.

त्यानुसार अहमदनगर वन विभागात सन २०१४ मध्ये ९.१६ लाख रोपे व सन २०१५ मध्ये ६.७० लाख रोपे लावण्यात आली असून त्यापैकी सन २०१६ मे अखेर सन २०१४ मधील ७.७५ लाख रोपे जिवंत असून जिवंत रोपांची टक्केवारी ८५% आहे. तर सन २०१५ मधील ५.३० लाख रोपे जिवंत असून त्यांची टक्केवारी ७९% आहे.

तसेच संगमनेर उप विभागामध्ये सन २०१४ मध्ये १०.३० लाख रोपे लावण्यात आली असून त्यापैकी सन २०१६ मे अखेर ६.९३ लाख रोपे जिवंत आहेत व जिवंत रोपांची टक्केवारी ६८% आहे. तसेच सन २०१५ मध्ये १४.६० लाख रोपे लावण्यात आली असून त्यापैकी सन २०१६ च्या मे अखेर ९.८३ लाख रोपे जिवंत आहेत व जिवंत रोपांची टक्केवारी ६८% आहे.

(२) संयुक्त वनव्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, विविध गावांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत स्वयंसेवी संस्था शाळा व महाविद्यालये येथे जनजागृती करण्यात येत असून वनांचे महत्व समजून देण्यात आलेले आहे. तसेच वनांना आगी लागू नये म्हणून वन कर्मचारी तैनात ठेवण्यात येतात. तसेच जाळ रेषा घेण्यासाठी कार्यआयोजनेनुसार अनुदान उपलब्ध करुन घेवून जाळ रेषा घेण्यात येतात. तसेच अचानक काही कारणास्तव आग लागली तर वनसंरक्षण समिती व गावकऱ्यांशी संपर्क साधून वन कर्मचारी यांच्या मदतीने आग विझवली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याअंतर्गत येणाऱ्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांच्या कोलारा गेट मधून जंगल भ्रमण करणाऱ्या पर्यटकांच्या गैरसोयीबाबत**

**(४२) ६३५०० (२४-०८-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याअंतर्गत येणाऱ्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांच्या कोलारा गेट मधून जंगल भ्रमण करणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अनेक पर्यटक जंगल भ्रमण सफारीकरिता वाहन व निवासाची सोय उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चिमूर तालुक्यातील स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करुन पर्यटन वाढीसाठी वन विभागामार्फत कोलारा गेट येथे काही विशेष कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे काय व त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२७-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोलारा या प्रवेश गेटवर पर्यटकाना जंगल भ्रमण / सफारी करीता अधिकृतरित्या नोंदणीकृत एकूण ३३ खाजगी जिप्सी उपलब्ध आहेत. तसेच व्याघ्र प्रकल्पाची एक २२ आसनी कॅन्टर खुली बससुध्दा उपलब्ध आहे. पर्यटकांच्या निवासाच्या सोयीकरीता वनविकास महामंडळाचे एक निसर्ग पर्यटन संकुल व ८ खाजगी रिसोर्टस कोलारा गेटजवळ अस्तित्वात आहेत.

(३) कोलारा गेट परिसरातील खाजगी जिप्सी मालक, चालक आणि मार्गदर्शक गेटजवळील बफर क्षेत्रात सुध्दा पर्यटन सुरु करण्यात आले आहे. सदर मार्गावर सकाळ व दुपारी फेरी धरुन १२ वाहनांना प्रवेश देण्यात येत असल्याने स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये करावयाच्या कामांचा आराखडा**

**(४३) ६३५५९ (२४-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १२५ गावांची निवड करण्यात आली असली तरी निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये करावयाच्या कामांचा आराखडा करण्यास विलंब झाल्याने व पावसाळा सुरु झाल्याने जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजना असफल झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १२५ गावांतील जलयुक्त शिवाराची अंदाजे ४ हजार १०७ कामे केव्हा पूर्ण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील कामांचा आराखडा मंजूर करण्यास विलंब करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) अकोला जिल्हयातील जलयुक्त शिवार ची कामे मार्च, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ३२९ कोल्हापूरी बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था

**(४४) ६३६५२ (२४-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ३२९ कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याने सदर बंधाऱ्यांच्या माध्यमातून सिंचन होत नसल्याचे माहे मे २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात आढळुन आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने जिल्हयातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**प्रा. राम शिंदे (२८-१०-२०१६) :** (१) लघु सिंचन, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्याकडे एकूण ६४८ कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे असून त्यापैकी २७३ सुस्थितीत आहेत व ३७५ नादुरुस्त आहेत. सुस्थितीत असलेल्या २७३ बंधाऱ्यातून सिंचन होत असून नादुरुस्त असलेल्या ३७५ बंधाऱ्यातून पुर्णक्षमतेने सिंचन होत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सन २०१६-१७ या वर्षात कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे दुरुस्तीची कामे पुढीलप्रमाणे प्रस्तावित आहेत.

१. जलयुक्त शिवार योजना - २१ कामे
२. जिल्हा परिषद सेस फंड - १ काम
३. विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम - १४ कामे

---

**मध्यचांदा (जि.चंद्रपूर) वनविभागातील धाबा परिक्षेत्रातील पानवठ्यावर मचान उभी न करताच मचान उभी केल्याचे दाखवून त्या ठिकाणी चौकीदाराची नोंदी कागदोपत्री दाखविल्याबाबत**

**(४५) ६३६५३ (२४-०८-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यचांदा (जि.चंद्रपूर) वनविभागातील धाबा परिक्षेत्रातील पानवठ्यावर मचान उभी न करताच मचान उभी केल्याचे दाखवून त्या ठिकाणी चौकीदाराची नोंदी कागदोपत्री दाखविल्याची बाब माहे मे २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खोटी माहिती पुरविण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :**(१), (२) व (३) "मचाणीचा देखावा चौकीदाराच्या नोंदीही कागदोपत्री धाबा परिसरात वन्यप्राण्यांच्या प्रगणनेला दिला खो" या शिर्षाखाली दिनांक ३१.०५.२०१६ रोजी दैनिक लोकमत वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असता बातमीमध्ये सत्य आळढून आलेले नाही.

---

**दक्षिण मुंबईतील सेंट जॉर्ज रुग्णालयातील वातानुकूलीत यंत्रणा बंद असल्याबाबत**

**(४६) ६३७१९ (२२-०८-२०१६). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनस जवळ असणाऱ्या सेंट जॉर्ज रुग्णालयातील वातानुकूलीत यंत्रणा माहे मे, २०१६ पासून बंद असून अत्यंत धीम्या गतीने दुरुस्तीचे काम सुरु असल्याने शस्त्रक्रिया विभाग बंद ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या निवासस्थानातील वातानुकूलीत यंत्रणेचा विद्युत पुरवठा खंडित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबात शासनाने चौकशी करून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये मुख्य शस्त्रक्रियागृह विभागातील ए सी. यंत्रणेत बिघाड झाल्याने सदर शस्त्रक्रियागृह काही काळ बंद ठेवण्यात आले होते. तथापि सदर कालावधीत अतिदक्षता विभागातील वॉर्ड क्र. ४ मधील शस्त्रक्रियागृहात रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच सदरचे शस्त्रक्रियागृह दुरुस्तीअंती पुर्ववत नियमित सुरु करण्यात आलेले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई येथील निवासी डॉक्टरांच्या निवासस्थानामध्ये संस्था प्रशासनामार्फत ए.सी.यंत्रणेची सुविधा पुरविण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येऊरच्या (जि.ठाणे) अंतर्गत ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, अतिक्रमण हटवणे व सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांच्या मद्यपानावर बंदी आणणे तसेच वनरक्षकांची संख्या वाढवण्याची मागणी**

**(४७) ६३८४३ (२४-०८-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येऊरच्या (जि.ठाणे) अंतर्गत ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, अतिक्रमण हटवणे व सहलीसाठी येणाऱ्या पर्यटकांच्या मद्यपानावर बंदी आणणे तसेच वनरक्षकांची संख्या वाढवण्याची मागणी प्राणीमित्रांनी माहे मे, २०१६ रोजीच्या दुसऱ्या आठवड्यात लेखी निवेदनाव्दारे वन विभागाला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) येऊर येथे महत्वाच्या ठिकाणी नव्याने ३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वनक्षेत्रात अवैध प्रवेश, अतिक्रमण रोखण्याच्या व मद्यपानावर आळा घालण्याच्या दृष्टीने सन २०१५-१६ मध्ये येऊर गावांचे वनक्षेत्र हद्दीवर ११०० मीटर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात आले असून सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित १००० मीटर संरक्षण भिंतीपैकी ४०० मीटर भिंतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सन २०१६-१७ मध्ये २१०.७० चौ.मी. क्षेत्र अतिक्रमण मुक्त करण्यात आले आहे.

गटारी अमावस्था व ३१ डिसेंबर या दिवशी मद्यपान करुन धिंगाणा घातल्यास अटकाव करणेच्या दृष्टीने येऊर वनक्षेत्रातील वन कर्मचारी, राज्य राखीव दल, सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस यांचा बंदोबस्त ठेवण्यात येतो. तसेच येऊर परिसरातील मधुबन गेट येथे २ वनरक्षक व ६ वनमजूरांची नेमणूक करण्यात आली असून ते या ठिकाणी नियमीत कार्यरत राहून नियंत्रण ठेवत असतात.

---

**मौजे मारेगाव वन (पुनर्वसन) (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील नागरीकांना जमिनीचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत**

**(४८) ६४१५३ (२४-०८-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मारेगाव वन (पुनर्वसन) (ता.केळापूर, जि.यवतमाळ) येथील नागरीकांना जमिनीचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मा.वने मंत्र्यांना दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी निवदेन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) टिपेश्वर अभयारण्यातील मौजे मारेगाव येथील ४१५ कुटूंबापैकी ३३० कुटूंबाचे पुनर्वसन दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात आले आहे. दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णय पुनर्वसन चालू असलेल्या गावातील फक्त पुनर्वसनासाठी शिल्लक असलेल्या कुटूंबानाच लागू आहे. सबब, सदर शासन निर्णयापूर्वी पुनर्वसित झालेल्या नागरिकांना जमिनीच्या वाढीव मोबदला देणे शासन धोरणाच्याविरुध्द राहील.

---

**जंगलाचे संरक्षण करण्यासह वन्यपक्षांबद्दल आस्था निर्माण व्हावी यासाठी वन व्यवस्थापन समिती स्थापन करण्याबाबत**

**(४९) ६४४२८ (२४-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा- गावाशेजारील जंगलाचे संरक्षण करण्यासह वन्यपक्षाबद्दल आस्था निर्माण व्हावी यासाठी राज्यात १५ हजार ९०० गावांमध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उन्हाळ्यात राज्यात अनेक ठिकाणी वणव्यांने जंगल आणि वन्यपशू होरपळून निघत असताना या समित्या कोठेही कार्यरत दिसत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समित्या फक्त शासनाने दिलेल्या योजनांचा लाभ घेण्यापुरत्याच अस्तित्व जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वन व्यवस्थापन समिती कार्यरत राहण्याच्या दृष्टीने वन व्यवस्थापन समित्यांना शासनाच्या वतीने सूचना देण्यात आल्या आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) नाही.
राज्यात वनांलगत असलेल्या १५९०० गावांपैकी एकूण १२५१७ गावांमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत व पुणे वनवृत्तातील पुणे महसूली जिल्ह्यात १०८२ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत.
(२) व (३) नाही.
(४) संयुक्त वनव्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, विविध गावांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत स्वयंसेवी संस्था शाळा व महाविद्यालये येथे जनजागृती करण्यात येत असून वनांचे महत्व समजून देण्यात आले आहे. तसेच वनांना आगी लागू नये म्हणून जाळपट्टे घेणे,

वॉच टॉवर उभारणे, वणवा प्रतिबंधक उपकरणे खरेदी करणे फिरत्या पथकाचे सक्षमीकरण करणे अशा उपाययोजना राबविण्यात येतात. तसेच काही कारणास्तव आग लागली तर वनसंरक्षण समिती व गावकऱ्यांशी संपर्क साधून वन कर्मचारी यांच्या मदतीने आग विझवली जाते. संयुक्त वनव्यवस्थापन समित्या वन विभागाचे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या गावालगतच्या वनक्षेत्रामध्ये वणवा विझवण्यास सक्रिय मदत करीत आहे त्यामुळे मागील ३ वर्षात वन वणव्यामुळे आगीच्या भक्षस्थानी पडलेले वनक्षेत्र कमी झालेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वनविभागांतर्गत वनरक्षक, रोपवन कोतवाल, वनपाल आणि सहाय्यक लागवड अधिकाऱ्यांप्रमाणे स्थायी वनमजुरांना प्रवास भत्ता मिळणेबाबत**

**(५०) ६४७७० (२४-०८-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वनविभागांतर्गत वनरक्षक, रोपवन कोतवाल, वनपाल आणि सहाय्यक लागवड अधिकारी या सवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रतिमहा रुपये १५००/- या दराने महसूल व वन विभागाच्या दिनांक २९ जानेवारी २०१६ च्या शासन निर्णयान्वये कायम प्रवास भत्ता मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा - गोंदिया जिल्ह्यातील स्थायी वनमजुरांनी प्रवास भत्ता लागू करण्यासाठी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना प्रवास भत्ता लागू करण्याचा शासनाचा विचाराधीन आहे काय,
(४) नसल्यास, प्रवास भत्यापासून स्थायी वनमजुरांना वगळण्याचे कारण काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अशी मागणी केली आहे.
(३) व (४) प्रस्ताव विचाराधीन नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.